# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दुरध्वनी क्र. ०२५१ - २७२०११६,　　विस्तार क्र.२२५　　proumc321@gmail.com


०१/०८/२३ १०:४५

जा.क्र.उमपा/पिआरओ/　　/२०२३
दिनांक : ०१/०८/२०२२

## प्रेसनोट

देशात व राज्यात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव वर्षाचा उपक्रम संपन्न होत असतानाच, केंद्र सरकारने "मेरी माटी मेरा देश" या नवीन उपक्रमाची घोषणा केलेली आहे. यानुसार आपल्या मातीविषयी जनजागृती, प्रेम आणि साक्षरता निर्माण व्हावी याबाबत विविध पातळीवर विविध प्रकारचे कार्यक्रम घेणे अपेक्षित आहे असे नमुद केले आहे. त्याअनुषंगाने दिनांक ९ ते १५ ऑगस्ट २०२३ या कालावधीत सदर कार्यक्रम राबविण्यासाठी आज दिनांक ०१/०८/२०२३ रोजी १२ वाजता मा. आयुक्त तथा प्रशासक श्री. अजीज शेख यांच्या उल्हासनगर महानगरपालिका अध्यक्षतेखाली समितीची शहर स्तरीय "मेरी माटी मेरा देश" या बाबत बैठक आयोजीत करण्यात आली होती.

सदर बैठकीस महापालिका आयुक्त तथा प्रशासक श्री. अजीज शेख तसेच अति. आयुक्त श्रीम. करुणा जुईकर मॅडम व श्री. जमिर लेंगरेकर, उप-आयुक्त, सेंट्रल पोलीस स्टेशनचे/विठ्ठलवाडी/उल्हासनगर पोलीस स्टेशनचे वरीष्ठ पोलीस निरिक्षक/तसेच कृषी विभागाचे अधिकारी पोस्ट ऑफिसचे अधिकारी / बी.एस.एन.एल. चे अधिकरी उपस्थित होते.

तसेच विभाग प्रमुख सर्व प्रभाग अधिकारी उपस्थित होते. या अनुषंगाने मा. अजीज शेख यांनी मा. अतिरिक्त आयुक्त यांना "मेरी माटी मेरा देश" अभियानाबाबत सादरीकरण करण्यास सुचविले. त्यानुसार मा. अतिरिक्त आयुक्त यांनी खालील मुद्दयाबाबत सादरीकरण करण्यात आले.

- हुतात्मांना/ शहिदांना वंदन म्हणुन शिला फलक उभारणे. 'पंच प्रण' प्रतिज्ञा घेणे.
- सर्व नागरिकांना "मेरी माटी मेरा देश" कार्यक्रमाबाबत सहभागाबाबत आवाहन करणे.
- 'पंच प्रण' प्रतिज्ञा करिता माती/मातीचे दिवे सर्व प्रभाग समितींमध्ये उपलब्ध करुण देणे.
- सर्व प्रभाग समितींमध्ये ७५ प्रकारचे वृक्ष /झाडे/रोपे देशी प्रजातीच्या अमृतवाटीका तयार करण्यात येतील.
- स्वातंत्र्य सेनानी/कर्तव्य बजावतांना शहीद झालेले वीर पोलीस इत्यादींचा सन्मान करणे.
- १५ ऑगस्ट २०२३ ला सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन करणे. ध्वजारोहण व राष्ट्रगान करणे.
- "मेरी माटी मेरा देश" (merimaatimeradesh.gov.in) या वेबसाईटवर हातात माती/मातीचे दिवे घेवुन 'पंच प्रण' प्रतिज्ञा करतानांचा सेल्फी फोटो अपलोड करणे.

वरीलप्रमाणे कामाचे नियोजन करुन, मा. आयुक्त श्री. अजीज शेख यांनी खालीलप्रमाणे सुचना केल्या.

७५ प्रकारची झाडे उपलब्धतेबाबत मा. आयुक्तांनी आदेश दिले, स्वातंत्र्य सैनिक यांचा सत्कार करण्याबाबत, शाळा कॉलेज यांना प्रभात फेरी काढणे, माननीय खासदार व आमदार उल्हासनगर, अंबरनाथ, कल्याण यांना आमंत्रित करणे, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय यांचेकडुन सैनिक बॉर्ड निवासी उपजिल्हाधिकारी शहिदांची यादी मिळवणेबाबत. BSNL यांनी रिंग टोन दुरध्वनी संदेश देणे, सर्व विभागांनी या कार्यक्रमात सहभाग घेणे. Whats app ग्रुप बनविणे, शहरात ०५ शिला फलक लावणे, सेल्फी पॉईन्ट बनवणे.

मा. अजीज शेख, समितीचे अध्यक्ष यांनी "मेरी माटी मेरा देश" या अभियांनात शहरातील नागरिक, शाळा, महाविद्यालये, एनजीओ, कार्यालये, राजकीय पक्ष, लोकप्रतिनिधी या सर्वांना सहभागी करून घेतले जाणार आहे.

१/८/२३
(छाया प्रकाश डोंगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.